सकाळ



गडहिंग्लज : रवळनाथ संस्था समूहातर्फे दीपा देशमुख यांचा सत्कार मीना रिंगणे यांच्या हस्ते झाला. यावेळी एम. एल. चौगुले, धनश्री पाटील, डी. के. मायदेव, उत्कर्षा पोतदार आदी उपस्थित होते.

# मानवतावादी कृतीतून वैश्विक हिताचे कार्य

## दीपा देशमुख : 'रवळनाथ'तर्फे व्याख्यान

गडहिंग्लज, ता. ९ : व्यक्तीने भूतकाळापेक्षा वर्तमानात जगले पाहिजे. मानवतावाद हाच खरा धर्म आहे, हे मान्य करायला हवे. वाचन संस्कृतीतून व्यक्ती म्हणून सर्वांगीण विकास होतो आणि मानवतावादी विचार व कृतीतून वैश्विक हिताचे अद्वितीय कार्य घडेल, असे प्रतिपादन पुण्याच्या लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या दीपा देशमुख यांनी केले.

येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी, झेप अॅकॅडमी, महालक्ष्मी वुमेन्स क्रेडिट सोसायटीतर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार व महिला दिन मार्गदर्शन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. 'मला भेटलेल्या स्त्रिया' या विषयावर त्यांनी मांडणी केली. संस्थापक एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. स्वदेश सेवा फाउंडेशनच्या संस्थापक धनश्री पाटील, रवळनाथच्या उपाध्यक्षा मीना रिंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

धनश्री पाटील यांनी आजची स्त्री सक्षम होत असून, त्यांच्या जीवनात आर्थिक स्थिरता आल्यास ती स्वावलंबी बनेल, असे मत व्यक्त केले. चौगुले यांनी स्त्रियांना सर्व क्षेत्रांत काम व नेतृत्व करण्यास संधी दिल्यास निश्चितच त्या प्रभावीपणे ठसा उमटवतील, असा विश्वास व्यक्त केला. महसूल सहायकपदी निवडी झाल्याबद्दल निकिता माने, शालन धनगर यांचा सत्कार झाला. माने व धनगर यांनी मनोगत व्यक्त केले. मीना रिंगणे यांनी स्वागत केले. उत्कर्षा पोतदार यांनी आभार मानले.